Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-III MARCH 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

भारतीय अर्थव्यवस्थेवर जीएसटीचे सकारात्मक आणि नकारात्कम परिणाम

प्रा. डॉ. भगवान सांगळे,
वाणिज्य विभाग,
बाबुजी आव्हाड महाविद्यालय,पाथर्डी जि.अहमदनगर

प्रस्तावना :

देशाचा कारभार चालविण्यासाठी कोणत्याही सरकारला मोठया प्रमाणावर खर्च करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी शासनाला उत्पन्नाची साधने जुळवावी लागतात. जगातील सर्वच देश आपल्या नागरीकांकडून हा खर्च अंशत किंवा पुर्णत: वसूल करतात. त्यासाठी शासन नागरीकांवर विविध प्रकारच्या कराची आकारणी करते. हे कर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन प्रकारचे असतात. वस्तू व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर आहे.

वस्तू आणि सेवा कर प्रत्येक मूल्यव्यतिरिक्त मूल्यांवर आकारले जाणारे एक सर्वसमावेशक,मल्टिस्टेज,डेस्टिनेशन आधारित कर आहेत. एक देश एक कर प्रणाली आणण्यासाठी भारतातील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) अंमलात आणला आहे,परंतू विविध उद्योगांवर त्याचा परिणाम किंचित वेगळा असेल.हा उद्योग उत्पादन,वितरण आणि किरकोळ विक्रिशी संबंधित आहे किंवा सेवा देत आहे यानुसार फरक पहिल्यावरलक्षात येईल.

जीएसटी करांची कल्पना पहिल्यांदा तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री मा.पी. चिदंबरम यांनी त्यांच्या सन २००६–०७ च्या अर्थसंकल्पिय भाषणात मांडली ज्या राज्य वितमंत्री समितीच्या स्थापनेने मुल्यवर्धित कर प्रणाली अंमलात आणली होती. त्यांनाच वस्तू व सेवा कराचा आराखडा व संरचना तयार करण्याची विनंती करण्यात आली. जीएसटीच्या संदर्भात सन २००९ मध्ये प्रथम चर्चा पत्रिका प्रसिध्द करण्यात आली होती.

भारतात जीएसटी विषयी चर्चा सुरू झाली असली तरी जगाला जीएसटी नवीन नाही. फ्रान्स हा पहिला देश आहे, तेथे वस्तू आणि सेवा करांची प्रणाली स्वीकारली गेली. फ्रान्समध्ये १९५४ पासून जीएसटी अस्तित्वात आहे. आज जगामध्ये १४० पेक्षा अधिक देशांमध्ये जीएसटी ही करपध्दती अप्रत्यक्ष करांच्या संकलनासाठी वापरली जाते.

जीएसटी म्हणजे काय?

जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर असून तो वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर यापुढे लागू राहील अनेक विकसीत देशात याच पध्दतीची करप्रणाली अस्तित्वात आहे. त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा येणार आहे.

संशोधनांचे उद्दिष्टये:

संशोधनाचे उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

- वस्तू व सेवा करांची संकल्पना जाणून घेणे.
- जीएसटीचे सकारात्म परिणामसमजून घेणे.
- जीएसटीचे नकारात्म परिणाम समजून घेणे.
- जीएसटीवर पुढील संशोधन कार्यासाठी माहिती निर्माण करणे.

संशोधन पध्दती:

हा संशोधन लेख पुर्ण करण्यासाठी दुययम साधनाचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमान पत्रातील लेख तसेच इंटरनेट वरील माहितीचा आधार घेतला आहे. तसेच प्रस्तृत संशोधन लेख पुर्ण करण्यासाठी विश्लेषणात्मक व अनुभवावर आधारीत पध्दतीचा वापर केला आहे.

जुनीकर पध्दती :

देशात दोन प्रकारचे प्रमुख कर आहेत ते म्हणजे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर. आतापर्यंत भारतात वस्तु व सेवा वर जे वेगवेगळे कर लावले जात होते ते इतके जास्त कर होते की, माहीतच होत नव्हते कोणता कर कशावर लावला जात आहे. जसे केंद्र सरकार मध्ये उत्पादन शुल्क जो माल उत्पादीत केल्यानतंर लावला जात होता. ह्या व्यतिरिक्त सेवा कर जो वेगवेगळ्या सेवावर लावला जात होता त्याशिवाय अतिरिक्त उत्पादन शुल्क व इतर असे अनेक प्रकारचे वस्तु व सेवा कर लावले जात होते. राज्य सरकारमध्ये देखिल मुल्यवर्धीत करा व्यतिरिक्त करमणुक कर, ऐषोआराम कर, स्थानिक संस्था कर, नाका कर यासारखे वेगवेगळे कर लावले जातात. त्यामुळे वस्तु व सेवाच्या किंमतीत फार मोठी तफावत राहायची आणि या प्रत्येक राज्यतील तफावतीमुळे वेगवेगळी बाजारपेठ निर्माण व्हायची. हे सर्व केंद्र आणि राज्यसरकारचे जे काही कर लावले जायचे या सर्वाना एका छत्राखाली आणून त्याला वस्तु व सेवा कर अर्थात जीएसटी असे नाव देण्यात आले आहे. हा एकमेव सिंगल युनिफार्म टॅक्स आहे जो की, केंद आणि राज्य एकाच वेळेस लावतील आणि त्यामध्ये सांगीतलेले सर्व कर हे समाविष्ठकेले जाणार आहेत.

नविन कर पध्दती:

भारतात सन २००५ मध्ये व्हॅट लागू करण्यात आला. त्यावेळी तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी.चिदंबरमं यांनी जी.एस.टी चा प्रथम उलेख केला होता. एक कसा कायदा ज्यामध्ये सर्व प्रकारचे अप्रत्यक्ष कर समाविष्ट असतील आणि एक सुटसुटीत आणि सोपी करप्रणाली उद्योगासाठी उपलब्ध होईल. त्यानंतर या कायदाचा मसुदा तयार करण्याचे काम त्यांना देण्यात आले. सन २००९ मध्ये प्रथम चर्चा पत्रिका प्रसिध्द करण्यात आली होती. केंद्र आणि राज्यसरकारे यांच्यामध्ये अनेक बैठका झाल्या व जी.एस.टी. कायदयाचा ठोबळ मसुदा तयार करण्यात आला.

सर्व राज्ये आणि केंद्रसरकार यांच्या चर्चेमधून असे ठरले की जी.एस.टी. ही द्विस्तरीय करप्रणाली असेल. याचाच अर्थ असा की एकाच प्रकारच्या व्यवहारावर केंद्र आणि राज्य दोघेही कर आकारणी करू शकतील या मसुदयाप्रमाणे जी.एस.टी. चा दर संपुर्ण भारतासाठी एकच असेल.आणि गोळा होणारा कर हा केंद्र आणि राज्य आपापसात वाटून घेतील. सन १९५० नंतरचे भारतीय करप्रणालीमधले सर्वात मोठे प्रस्तावित परीवर्तन आहे.

कर आकारणी करण्याकरीता जी.एस.टी.मंडळ स्थापन करण्यात येईल. त्याचे अध्यक्ष केंद्रीय अर्थमंत्री असतील व सदस्य अर्थ राज्यमंत्री असतील. कोणत्याही एका राज्याचे अर्थमंत्री हे उपाध्यक्ष असतील. इतर राज्याचे अर्थमंत्री सदस्य असतील. मतदानात केंद्राचा वाटा एक तृतीयांश व राज्याचा वाटा दोन तृतीयांश असेल. म्हणजेच जीएसटी मंडळात एक तृतीयांश सदस्य केंद्राचे तर दोन तृतीयांश सदस्य राज्याचे असतील. कोणत्याही कर आकारतांना ७५ टक्के मताची आवश्यकता असेल.

जीएसटी बील दिनांक ३ ऑगस्ट २०१६ ला राजसभेमध्ये पास झाले. तसेच त्यानंतर ते बील लोक सभेत पास करण्यात आले. जीएसटी कर हा १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. जीएसटी लागू केल्यानंतर राज्यांना पहिली पाच वर्ष केंद्र सरकार महसुलातील तोटा भरून देईल. पहिली तीन वर्ष राज्यांना १०० टक्के भरपाई दिली जाणार आहे. चौथ्या वर्षी ७५ टक्के तर पाचव्या वर्षी ५० टक्के भरपाई दिली जाईल असे ठरले.

जीएसटीचे सकारात्मक परिणाम:

- उत्पादनाच्या किंमती कमी होईल.
- देशभरात वस्तूंची किंमती सारख्या राहतील.
- व्यवहारात पारदर्शकता येईल.
- देशाचे एकूण उत्पन्न वाढण्यास मदत होईल.
- केंद्रीय उत्पादन शुल्क खात्यावर पडणारे ओझे कमी होणार.
- संघीय ढाचा मजबुत होण्यास मदत होईल.
- अनेक अप्रत्यक्ष कर रदद होणार.

- चालू वर्षात विकासदर ६.७५ टक्के नोदविला जाईल.
- चालू वर्षात निर्यात तसेच खाजगी गुंतवणूक वेग घेईल अशी आशा आहे.
- अप्रत्यक्ष करदात्याची संख्या पन्नास टक्के वाढली आहे.

जीएसटीचे नकारात्मक परिणाम:

- राज्य सरकारला मिळणारे करउत्पन्न कमी आहे.
- पेट्रोल, डीझेल, केरोसीन आदि उत्पादनांना पुढील पाच वर्ष जीएसटी लागू होणार नाही.
- सेवा महाग होत आहेत.
- राज्य सरकारांना महसूल मिळविण्यास अडचण येत आहे.
- जीएसटीमुळे ब–याच वस्तू महाग मिळत आहेत.
- व्यापारी वर्ग जीएसटीच्या नावाने बरीच लूट करत आहे.
- बरेच व्यापारी जीएसटीसह पावती देत नाहीत.
- जीएसटीचे दर कमी करणे गरजे वाटते.

सारांश:

भारतात दोन प्रकारे कराची आकारणी केली जात होती.ती म्हणजे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर होय. वस्तू व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर आहे.समजायला सोपा, अमंलबजावणीसाठी कमी गुंतागुंतीचा, उत्पन्नवाढीसाठी अधिक पोषक अशी कर प्रणालीहवी होती. परतुं जुनी करपध्दती पाहीली तर बरीच गुंतागुंतीची होती आणि म्हणून १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर लागु झालाआहे.जी.एस.टी.ही अप्रत्यक्ष करपध्दती आहे.तसेचदेशात विकासाचा वेग वाढविण्यासाठी आणि आर्थिक सुधारणांना गती देण्यासाठी जी.एस.टी. आवश्यक आहे.आपल्याला बाजारातील वस्तूच्या किंमती काही प्रमाणात स्थिर झालेल्या दिसतात.तसेच व्यवहारात पारदर्शकता येत असतांना दिसत आहे.त्याच बरोबर अप्रत्यक्ष कर दात्यांची संख्या वाढत असतांना दिसते.वस्तू व सेवा कराचे बरेच फायदे आहेत. त्यासाठी बराचा वेळ वाट पाहावी लागणार आहे.

राज्यांना मिळणारे उत्पन्न काही प्रमाणात कमी झालेले दिसते. कारण वस्तू व सेवा कर लावण्यापूर्वी प्रत्येक राज्याचा महसूल वेगवेगळया कराच्या माध्यमातून वसूल होत होता. परंतू आता सर्व कर रद्द होवून एकच कराची आकारणी केली जात आहे. त्याच बरोबर काही वस्तूंच्या किंमती कमी झालेल्या आहेत तर काही वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढझाली आहे. तसेच काही सेवा या महाग झालेल्या आहेत.पेट्रोल, डीझेल,हया वस्तूंना वस्तू व सेवा कर लावणे गरजेचे होते.परंतू या वस्तुंना जीएसटी मधून वगळयात आल्यामूळे त्यांच्या किंमती वाढतच आहेत.

संदर्भ:

१. दानी एस(२०१६), भारतीय अर्थव्यवस्थेवर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी),एक संशोधन पत्र.
२. जसप्रीत कौर (२०१६),गुडस ॲण्ड सर्व्हिस टॅक्स आणि त्याचा प्रभाव,इंटरनॅशनल जर्नल ऑफ अप्लाइड रिसर्च.
३. ए.डॅश (२०१७),भारतविरोधी आंदोलनाचे सामाजिक आर्थिक परिणाम, इंअरनॅशनल जर्नल मॅनेजमेंट ॲण्ड अप्लाइड सायंस.
४. ''जीएसटी सेक्टरवर परिणाम करेल''इकॉनॉमिसटॉइम्स.इंडियाटॉइम्स डॉटकॉम.
५. ''जीएसटी–विश्लेषण आणि मत''क्लिअरटॅक्स.
६. अर्थव्यवस्थेवर जीएसटीचा प्रभाव,हिन्दुस्थानटॉइम्स डॉटकॉम.